भारतीय संस्कृति प्रबोधिनीच्या गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राचे स्नेहसंम्मेलन मोठया दिमाख्यात व उत्साहात साजरे

गोव्यातील एकमेव असलेल्या गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राचे स्नेहसंम्मेलन ११ फेब्रुवारी रोजी रविंद्र भवन - मडगांव येथे मोठया दिमाखात व मोठया उत्साहात पार पडले. या स्नेहसंम्मेलनासाठी मुख्य अतिथी म्हणुन गोव्याचे उपमुख्यमंत्री श्री. चंद्रकांत कवळेकर उपस्थित होते. त्याबरोबर व्यासपिठावर विशेष अतिथी म्हणून आय. आय. टी. चे प्राध्यापक श्री. जी व्ही. प्रभू उपस्थित होते. त्याच्याबरोबरच व्यासपिठावर भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे अध्यक्ष श्री. पां. के. घाटे, गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राच्या प्राचार्या डॉ. अनुरा प्रशांत बाळे व गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राच्या विद्यार्थी प्रतिनीधी कु. मयंक चव्हाण उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलतेवेळी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी श्री चंद्रकांत कवळेकर यांनी आयुर्वेद ही आधुनिक काळाची गरज असून जास्तीत जास्त लोकांनी या शास्त्राचा उपयोग आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी केला पाहिजे असे सांगितले. त्याबरोबरच त्यांनी भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे त्यांच्या वाटचालीसाठी भरभरून कौतुक केले.

विशेष अतिथी म्हणून लाभलेले श्री. जी. व्हि. प्रभू यांनी आयुर्वेद शास्त्रशिकणाऱ्यांनी नवनवीन संशोधने करावी व शास्त्राला जगभरात प्रसिध्दी मिळवून द्यावी अशी इच्छा व्यक्त केली. त्याबरोबरच त्यांनी गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र व कामाक्षी आरोग्यधाम मध्ये मिळणाऱ्या सुविधांचा फायदा जनतेने करून घ्यावा असे आवाहन केले.

संस्थेचे अध्यक्ष श्री. पां. के. घाटे यांनी बोलतेवेळी भारतीय संस्कृति प्रबोधिनीच्या २६ वर्षांच्या यशस्वी वाटचालीबद्दल महिती करून दिली. व त्यानंतर त्यांनी गोमंतक आयुर्वेद महाविद्यालयामधे सुरू झालेल्या पदव्युत्तर वर्गांची माहिती दिली.

संस्थेच्या प्राचार्या डॉ. अनुरा प्र. बाळे यांनी गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्राचा वार्षिक अहवाल सादर करून सर्व विद्यार्थी व शिक्षक वर्गाचे विशेष कौतुक केले.

डॉ. मिथुन बोंद्रे यांनी प्रेरणा या इ- नियतकालीकाची ओलख करून दिली.

पाहुण्यांची ओळख डॉ. गौरव देसाई, डॉ. अदिती महाजन व डॉ. अविनाश कांदे यांनी करून दिली. कु. मयंक चव्हाण यांनी आभार प्रदार्शन केले.

ILLUMINANCE

ILLUMINANCE
Mast. MAYANK CHAVAN
Dr. ANURA BALE
Prof. Dr. G.V. PRABHU
Shri. P. K. GHATE

ILLUMINANCE